महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापू/विवि/बीबीए-बीसीए शुल्क २०२४-२०२५ / 841 दिनांक 11 MAR 2025

महत्वाचे परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित ,
विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित,
बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड
अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवीदिल्ली बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाचे शुल्काबाबत**

संदर्भ: १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता -२०२४/प्र.क्र.२४५/तांशि दि.०७/०८/२०२४
२) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि -४ दिनांक ०३/०२/२०२५
३ ) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.बैठक -२०२५ /प्र.क्र.४१ /तांशि -४ दिनांक ०६/०३/२०२५
४ ) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.१८ /तंशिस /डीबीटी /विकापू २०२४-२५/१४७ दिनांक १०/०३/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवीदिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना आहे त्या स्थितीत ( As and where ) परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तसेच तदनंतरही बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष , मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

येथे नमूद करण्यात येते की , सदर्भाधीन दिनांक ०३/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत वरील अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये समावेश

करण्यात आला आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शासनडीबीटी योजनेतून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून ते प्रशासकीय कारणास्तव व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून विलंबाने घोषित झाले आहेत. सदर अभ्यासक्रमांचे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करावयाचे आहे. मात्र सदर अभ्यासक्रमांच्या संस्थासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हा संक्रमण कालावधी असल्यामुळे शुल्क नियामक प्राधिकरणाच्या विनंतीच्या अनुषंगाने या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन पत्र दिनांक ६.३.२०२५ अन्वये मा.मंत्रीमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्राप्त आदेशानुसार केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्याअनुषंगाने डीबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीबद्दल खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे , अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नित आहेत , त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थामधील अभ्यासक्रमांना त्या पूर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये निर्धारित केलेले शुल्क आकारण्यात यावे.

२) ज्या संस्थामध्ये सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वीपासून सुरु होते. मात्र , शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने , त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क हे त्या अभ्यासक्रमांना त्यापूर्वीचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये संबधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

संदर्भ क्रमांक ३ . नुसार बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित होऊन या अभ्यासक्रमांना शासनाची शिष्यवृत्ती योजना लागू केली असून डीबीटी पोर्टलवर या संस्थाचे शुल्क नोंद करणे अनिवार्य आहे. संबधित संस्थेकरिता विद्यापीठांकडून प्रमाणित करण्यात आलेले शुल्क तात्पुरते शुल्क ( Ad Hoc Fee ) म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ग्राह्य धरले जाईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे आकारण्याच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांकरिता संस्थाचे ( नवीन अथवा जुन्या संस्था ) शुल्क डीबीटी पोर्टलवर मंजुरी साठी तात्काळ या कार्यालयाकडे (ऑनलाईनरित्या महाडीबीटी पोर्टलमार्फत ) पाठवावे.सोबत विद्यापीठाने उपरोक्त नमूद अभ्यासक्रमांना मंजूर केलेल्या शुल्काची प्रत अपलोड करावी.

तसेच महाडीबीटी प्रणालीवर शुल्क पडताळणी झाल्यानंतर आपल्या संस्थेतील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज ( आवश्यक त्या कागदपत्रांसह ) अंतिम दिनांकापूर्वी पुढील तपासणीसाठी पुढे पाठवावेत. संस्थेतील कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहू नये याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

सोबत : संदर्भिय परिपत्रक

( मा.रा.जाधव )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता

FIC

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल § desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ९४८
दिनांक:- १०/०३/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दि. ७.८.२०२४
२) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि-४, दि. ३.२.२०२५
३) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.६.३.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी शै वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत (As and Where ) परिषदेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये तसेच तदनंतरही बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य

सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष ,मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करुन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

येथे नमूद करण्यात येते की, संदर्भाधीन दिनांक ३.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत वरील अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर शिष्यवृत्तीयोजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शासनाडिबीटी योजनेतून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून ते प्रशासकीय कारणास्तव व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून विलंबाने घोषित झाले आहेत. सदर अभ्यासक्रमांचे शुल्क प्रथमच शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करावयाचे आहे. मात्र सदर अभ्यासक्रमांच्या संस्थांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हा संक्रमण कालावधी असल्यामुळे शुल्क नियामक पाधिकरणाच्या विनंतीच्या अनुषंगाने या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन पत्र दिनांक ६.३.२०२५ अन्वये मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्राप्त आदेशानुसार केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्यानुषंगाने डिबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीबद्दल खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नित आहेत, त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थामधील अभ्यासक्रमांना त्या पुर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात यावे.

२) ज्या संस्थांमध्ये सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वीपासून सुरु होते. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने,त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क हे त्या अभ्यासक्रमांना त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये संबंधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

संदर्भ क्र. ३ नुसार बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित होऊन या अभ्यासक्रमांना शासनाची शिष्यवृत्ती योजना लागू केली असून डिबीटी पोर्टलवर या संस्थांचे शुल्क नोंद करणे अनिवार्य आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे शुल्क

आकारण्याच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांकरिता संस्थांचे (नवीन अथवा जुन्या संस्था) शुल्क डिबीटी पोर्टलवर मंजूर करताना सहसंचालक, विभागीय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, संबंधित संस्थेकरिता विद्यापीठांकडून प्रमाणित करण्यात आलेले शुल्क तात्पुरते शुल्क (Ad Hoc Fee) म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ग्राहय धरावे व याकरिता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय सहसंचालक कार्यालयाची असेल याची नोंद घ्यावी. तसेच याबाबत सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना याबाबत अवगत करावे.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीस्तव:

१. मा. अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई यांना
२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना
३. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना

प्रत माहीती व आवश्यक कार्यवाहिकरिता:

१. सर्व प्राचार्य, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड संस्था